# डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे शैक्षणिक विचार

**बाळासो आण्णा सुतार** प्रा. डॉ. एन डी पाटील महाविद्यालय, मलकापूर . चलभाष ९७३०८९१४२८

-------------------------------------------------------------------------------------------------------------------

-

सारांश

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे शैक्षणिक विचार अत्यंत प्रगल्भ आणि क्रांतिकारी होते. त्यांच्या मते शिक्षण हे समाज परिवर्तनाचे सर्वात प्रभावी साधन आहे. त्यांनी दलित, शोषित, आणि समाजातील दुर्बल घटकांच्या उन्नतीसाठी शिक्षणाला सर्वाधिक महत्त्व दिले. त्यांच्या मते, शिक्षण हे प्रत्येक व्यक्तीचा मूलभूत हक्क आहे. त्यांनी शिक्षणाच्या सार्वत्रिकीकरणाचा विचार मांडला, ज्यायोगे प्रत्येक जात, धर्म, वर्गातील लोकांना शिक्षणाचा लाभ मिळावा. ते म्हणायचे, "शिका, संघटित व्हा, संघर्ष करा." डॉ. बाबासाहेब आंबेडकर याचे प्राथमिक, माध्यमिक व महाविद्यालयीन शिक्षणासंबंधीचे विचार अतिशय मूलगामी व विचार प्रवर्तक आहेत. गरीब खेड्यातील विद्यार्थी शिकला पाहिजे. स्त्री शिक्षणाला शासनाने प्राधान्य दिले पाहिजे अशी त्यांची प्रामाणिक इच्छा होती. भारतीय राज्यघटनेत सर्वांना शिक्षण मिळाले पाहिजे असे कलम घातलेले आहे. त्याचा त्यांनी अतिशय विचारपूर्वकपणे समाविष्ट केला आहे. भारताला सर्व बाजूंनी प्रगतीपथावर आणावयाचे असेल तर भारतीय समाज हा सुशिक्षित झाला पाहिजे असे त्यांना वाटत होते. घरातील स्त्री शिकली तर संपूर्ण कुटुंब हे सुशिक्षित होते. हा त्यांचा त्यावेळेचा दृष्टीकोन आजही शंभर टक्के लागू पडतो. संबंध माणवजातीचे कल्याण शिक्षणातच आहे असा त्यांचा दृष्टीकोन होता. या दृष्टीकोनामध्येच त्यांचे शैक्षणिक विचार दिसून येतात.

उदीष्टे

१ डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे व्यक्तिमत्व जाणून घेणे.

२. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या शैक्षणिक विचारांचा अभ्यास करणे.

३. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे शैक्षणिक कार्य समजून घेणे.

४. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी केलेल्या शैक्षणिक तरतुदी जाणून घेणे.

**संशोधन पध्दती**

प्रस्तुत शोध लेखासाठी 'वर्णनात्मक व विश्लेषणात्मक' संशोधन पध्दतीचा वापर करण्यात आला आहे. तथ्य संकलन प्रस्तुत शोध लेखासाठी संकलनाच्या व्दितीय स्त्रोताचा वापर केला असून यामध्ये विविध संदर्भ ग्रंथ, मासिके, संकेत स्थळ इत्यादीचा वापर करण्यात आला आहे.

**प्रस्तावना**

बाबासाहेब आंबेडकर म्हणजे एक अष्टपैलू व्यक्तिमत्त्व. सामाजिक, राजकीय, आर्थिक, शैक्षणिक, पत्रकारिता, कायदे अशा विविध क्षेत्रात आपल्या अमोघ वक्तृत्वाने व कुशल नेतृत्वाने डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी दीनदलितांच्या, श्रमिकांच्या, विस्थापितांच्या, शोषितांच्या अंधकारमय जीवनाला प्रज्ञेचा संदेश दिला. गलितगात्र झालेल्या मनामनातून समाजक्रांतीचे स्फुल्लिंग चेतवून मुर्दाड झालेल्या समाजाला आपल्या हक्काप्रती जागृत केले. त्यांचे जीवन एका उफाळलेल्या महासागरासारखे होते. शिक्षण हे समाज परिवर्तनाचे हत्यार आहे. त्याचा उपयोग झाला पाहिजे, असे त्यांना वाटत असे. जो समाज अशिक्षित असतो तो शिक्षणाअभावी सर्वस्व गमावलेला असतो, शिक्षणाने माणसात कर्तव्य आणि हक्काची जाणीव निर्माण होते, समाजाच्या सर्व थरापर्यंत शिक्षण गेले पाहिजे आणि आपल्या शिक्षणापासून वंचित समाजाला शिक्षणाचे महत्त्व अत्यंत सोप्या भाषेत आणि कळकळीने समजावून सांगताना बाबासाहेब म्हणतात, शिक्षण हे वाघिणीचे दूध आहे, ते जो प्राशन करील तो गुरगुरल्याशिवाय राहणार नाही.

प्रतिकूल परिस्थिती असलेल्या आणि अस्पृश्य गणलेल्या महार जातीत डॉ. बाबासाहेव आंबेडकरांचा जन्म मध्यप्रदेशातील महू' येथे १४ एप्रिल १८९१ रोजी झाला. त्यांच्या वडीलांचे नाव 'रामजी तर आईचे नाव भीमाबाई ' होते. रामजी सकपाळ हे सैन्यात मेजर होते. ते सुध्दा उद्योगी, महत्वाकांक्षी नि स्वतंत्र वृत्तीचे गृहस्थ होते. रामजीच्या मनावरती संत कबीरांच्या विचारसरणीचा प्रभाव होता. डॉ. बाबासाहेब आंबेडकर तीन वर्षांचे असताना वडील सेवानिवृत्त झाले. त्यामुळे ते महू मधून त्यांच्या रत्नागिरी जिल्ह्यातील 'काप-दापोली' या त्यांच्या मूळ गावी आले आणि येथेच डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी लहानपणी मुळाक्षरे गिरविली. मिळणाऱ्या अल्पशा निवृत्ती वेतनावरती घरखर्च चालेना. त्यातच त्यांना सातारा येथील सरकारी सार्वजनिक कामाच्या विभागामध्ये कोठावळा म्हणून नेमणूक झाली. साताऱ्यात असताना भीमाबाईचा मृत्यू झाला. मातेला पोरखा झालेल्या भीमरावांने प्राथमिक शिक्षण १८९६ साली सातारा येथील कॅम्प मिलिटरी स्कूलमध्ये

घ्यायला सुरुवात केली. त्यानी १९१२ साली मुंबई विद्यापीठातून पदवी घेतली आणि त्यानंतर उच्च शिक्षणासाठी अमेरिकेतील कोलंबिया विद्यापीठात गेले. तेथे त्यांनी अर्थशास्त्रात मास्टर्स आणि पीएच.डी. मिळवली. त्यांनी नंतर लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्समधून देखील अर्थशास्त्रातील डिग्री घेऊन बॅरिस्टर-ऑफ-लॉची पदवीही मिळवली. शिक्षण हे सर्वांगीण प्रगतीचे प्रवेशद्वार आहे, हा मंत्र बाबासाहेबांनी स्विकारला होता. ते स्वत: उच्च विद्याविभूषित होते. एम.ए., पीएच. डी., एल.एल.बी. बार ॲट लॉ, बॅरिस्टर अशा उच्च पदव्या त्यांनी मिळविल्या होत्या.

शिक्षण पूर्ण करून भारतात परतल्यानंतर बाबासाहेबांनी दलित समाजाच्या उद्धारासाठी आणि सामाजिक न्यायासाठी कार्य करण्यास सुरुवात केली. डॉ. आंबेडकरांनी तळागाळातील लोकांना जागृत केले. त्याना त्यांचे हक्क मिळवून देण्यासाठी प्राणाची बाजी लावली. इंग्रजांसमोर आपल्या समाजबांधवाची कैफियत मांडली. येवढेच करून ते थांबले नाहीत. त्यासाठी समाजाला संघटित करून २० जुलै १९२४ रोजी बहिष्कृत हितकारिणी सभेची स्थापना केली. अस्पृश्य म्हणून समाजात होणाऱ्या भेदभावाविरोधात लढा देण्यासाठी त्यांनी विविध आंदोलनांचे नेतृत्व केले. १९२७ मध्ये त्यांनी महाडच्या चवदार तळयाचा सत्याग्रह केला, तर १९३० च्या दशकात त्यांनी मंदिर प्रवेशाच्या हक्कासाठी आंदोलन केले, त्यांनी अस्पृश्यांसाठी राजकीय आरक्षण, शैक्षणिक संधी, आणि आर्थिक सुधारणा यांसाठी सतत प्रयत्न केले. भारताच्या स्वातंत्र्यानंतर डॉ. आंबेडकर हे संविधान निर्मितीसाठी स्थापन केलेल्या संविधान सभेचे अध्यक्ष म्हणून नेमले गेले. त्यांनी भारतीय संविधानाच्या मसुद्याचे नेतृत्व केले आणि असे संविधान तयार केले, की ज्यात प्रत्येक नागरिकाला समानतेचा अधिकार दिला गेला. त्यांनी संविधानाच्या माध्यमातून अस्पृश्यता निर्मूलनाचे कलम घालून समाजातील सर्व व्यक्तींना समान अधिकार मिळवून दिले. आपल्या जीवनाच्या शेवटच्या टप्प्यात डॉ. आंबेडकरांनी बौद्ध धर्माचा स्वीकार केला. हिंदू धर्मातील चातुर्रवर्ण्यव्यवस्था, अस्पृस्यता, विषमता नष्ट करण्यासाठी डॉ. आबेडकरांनी अनेक प्रयत्न केले. हिंदू धर्मातील थोर नेत्यांना भेटून अरपुरयता नष्ट करण्यासाठी वेळोवेळी चर्चा केल्या. परंतु त्याचा काहीही फायदा झाला नाही. हिंदू धर्मातील कर्मठ नेतृत्वांनी डॉ. आंबेडकरांना विरोधच केला. शेवटी हिंदू धर्माला कंटाळून त्यांनी स्वातंत्र्य, समता, बंधुत्व व न्यायावर आधारित असलेल्या व भारतीय मातीत जन्मलेल्या बौध्द धर्माचा १४ आक्टोबर १९५६ मध्ये स्विकार केला. त्यांना वाटले की जातिव्यवस्थेच्या अन्यायकारक चक्रातून बाहेर पडण्यासाठी धर्मांतर हा एकमेव उपाय आहे. १४ ऑक्टोबर १९५६ रोजी त्यांनी लाखो अनुयायांसह बौद्ध धर्माची दीक्षा घेतली. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे ६ डिसेंबर १९५६ रोजी निधन झाले. त्यांच्या विचारांची आणि कार्याची प्रभावीता आजही समाजात पाहायला मिळते. त्यांनी समाजातील दुर्बल, शोषित आणि दलित वर्गाच्या सक्षमीकरणासाठी केलेल्या कार्यामुळे त्यांना भारतीय समाजात एक विशेष स्थान मिळाले आहे. आजही डॉ. आंबेडकर यांना समाजसुधारक, मानवतावादी, आणि ज्ञानसंपन्न नेता म्हणून ओळखले जाते. त्यांनी दिलेला समानता, बंधुता, आणि न्यायाचा संदेश भारतीय समाजाच्या विकासात मोलाचा ठरला आहे.

शैक्षणिक विचारांचे सूत्र

शिक्षणामुळे परिवर्तन होते, हे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या शैक्षणिक विचारांचे सूत्र आहे. समाजाचा विकास करायचा असेल, तर शिक्षणापेक्षा दुसरे मोठे साधन या जगात नाही. यावर त्यांची गाढ श्रद्धा होती. समाजातील प्रत्येक व्यक्तीला शिक्षण दिले गेले पाहिजे, असे ते प्रतिपादन करतात. शिक्षण एक शक्ती असून त्याद्वारे व्यक्तीचा आत्मविश्वास वाढतो व या शक्तीच्या जोरावर व्यक्ती आलेले संकट परतवून लावू शकतो. शिक्षणातून व्यक्तीच्या विवेकाचा विकास होतो, त्याला चांगल्याची व वाईटाची जाणीव होते. त्यांनी चारित्र्याला खूप महत्त्वाचे स्थान दिले आहे. माणसाचे चारित्र्य हे त्याच्या वागणूकीवरून दिसून येते चागल्या चारित्र्य संवर्धनासाठी व्यक्तीमध्ये नैतिक मूल्यांची रूजवणूक होणे गरजेचे आहे ही रुजवणूक केवळ शिक्षणाच्या माध्यमातून उत्तम प्रकारे करता येईल. स्वच्छ, निष्कलंक चारित्र्य व्यक्तीला परमोच्य बिंदूवर येवून जाते. समाजामध्ये त्या व्यक्तीचा आदर्श निर्माण होतो. म्हणून शिक्षणातून चारित्र्य निर्माण होते असे म्हटल्या जाते. डॉ. आंबेडकरांनी शिक्षणाचे महत्व ओळखले होते. शिक्षणातूनच चांगल्या समाजाची निर्मिती होते याची जाणीव त्यांना होती. माणून शिक्षणासारखे पवित्र कार्य त्यांनी हाती घेतले. 'आप घरी वाटा, बाप घरीही बाटा' या 'बहिष्कृत भारत'मधील लेखात ते म्हणतात. "उपासमारीने शरीराचे पोषण कमी झाल्यास माणूस हिनबल होऊन अल्पायुषी होतो, तसेच शिक्षणाच्या अभावी तो निर्बुद्ध राहिल्यास जिवंतपणी दुसऱ्याचा गुलाम बनतो."[१] ( वसंत मून/हरी नरके, २००८, पृष्ठ ६६). डॉ. बाबासाहेब आबेडकरांनी आपल्या हयातभर ज्ञान संपादन केले, त्याचा संग्रह केला आणि त्या माध्यमातून गावकुसाबाहेरील समाजाला मुख्य धारेत आणले. भारतीय संविधानाची निर्मिती करून त्यामार्फत त्यांना मुलभूत हक्क बहाल केले. स्वातंत्र्य, समता, बंधुता आणि न्याय या मूल्यांवर आधारित समाज घडविण्यासाठी शैक्षणिक क्रांतीची आवश्यकता असल्याची जाणीव त्यांना होती. व्यक्तीला जाणीव करून देते तेच शिक्षण अशी त्यांनी शिक्षणाची व्याख्या केली. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी

गुलामाला त्याच्या गुलामीचे गुपित सांगताना सांगितले की, "उपासमारीने शरीराचे शोषण कमी झाल्यास माणूस अल्पायुषी होतो. तसेच, शिक्षणाच्या अभावी तो निर्बुद्ध राहिल्यास जिवंतपणीच दुसऱ्याचा गुलाम होतो." शिक्षणाच्या अभावाने माणसाच्या आयुष्यात गुलामी प्रवेश करते म्हणून स्वाभिमानाने, स्वावलंबनाने जीवन जगण्यासाठी शिक्षणाचे अत्यंत महत्त्व आहे. त्यांनी शिक्षणाला समाजसुधारणेचे मूळ मानले. संघटित होऊन, संघटन शक्ती मजबूत करून, संघर्षाकडे जाण्यासाठी लोकांनी सर्वप्रथम शिकले पाहिजे हा मोलाचा संदेश त्यांनी दिला. शिक्षणाशिवाय आपली शक्ती जागृत होणार नाही. आपण स्वतःला ओळखले पाहिजे, आपण कोणत्या पातळीवर आहोत याची जाणीव असली पाहिजे, त्याशिवाय आपल्यातील माणूस जागा होणार नाही. या सर्व बाबींकरिता एकच मार्ग आहे तो म्हणजे शिक्षण असे ते म्हणतात. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी शिक्षण वंचित दलित समाजाच्या शिक्षणासाठी पीपल्स एज्युकेशन सोसायटीची स्थापना करून दलित समाजाला जे शिक्षणाचे दान दिले ते जेवढे क्रांतिकारी आहे, तेवढेच मागासवर्गीयांच्या शिक्षणासंदर्भात बाबासाहेबांनी जे चिंतन केले तेही तितकेच मूलगामी स्वरूपाचे आहे. ज्ञानाअभावी व्यक्ती आणि समाजाचे नुकसान जसे होते, तसेच एखादी व्यक्ती वा समूहाला शिक्षण नाकारणे म्हणजे माणूस म्हणून त्याचे अस्तित्व नाकारून त्याच्या क्षमता मारून टाकणे होय; अशी बाबासाहेबांची शिक्षणविषयक धारणा होती. ४ ऑगस्ट १९१३ साली न्यूयार्क मधून आपल्या वडीलांच्या मित्रांना लिहिलेल्या पत्रात ते म्हणतात, "आपणास चांगले दिवस यावयाचे असतील आणि प्रगतीपथावर आपली वाटचाल अधिक गतीने व्हावयाची असेल तर मुलांच्या शिक्षणासोबत मुलींच्या शिक्षणाचाही तेवढ्याच गंभीरतेने विचार करावा लागेल असे ते म्हणतात."[२] (डॉ. आंबडेकर खाजगी पत्रे ४ ऑगस्ट १९१३) २० जुलै १९४२ रोजी नागपूर येथे अखिल भारतीय दलित महिला परिषदेप्रसंगी डॉ. आंबडेकरांचे भाषण झाले. यावेळी जनसमुदायापुढे बोलताना ते म्हणाले, स्वच्छ राहण्यास शिका व सर्व दुर्गणापासून मुक्त रहा. तुमच्या मुलांना शिक्षण द्या. हळूहळू त्यांच्या मनात महत्वाकांक्षा जागृत करा ते थोर पुरुष होणार आहेत. असे त्यांच्या मनावर बिंबवा, त्यांच्यातील हिनगंड नाहीसा करा. लग्न करण्याची घाई करु नका. शिक्षणाच्या माध्यमातून व्यक्तीला आपल्यावर होत असलेल्या अन्यायाची जाणीव होते व तो समदुःखी लोकांना एकत्र करून संघटित होतो. संघटित झालेले लोक आपल्या न्याय हक्कांसाठी संघर्ष करतात. म्हणून डॉ. बाबासाहेब आबेडकरांनी आपल्या अनुयायांना शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा असा संदेश दिला

त्यांच्या उपदेशानुसार समाजातील लोक मोठया प्रमाणात शिकले आहेत त्यांनी आपल्या हक्कांसाठी मोठमोठाल्या संघटनांची स्थापना केली आहे. आणि न्याय हक्क मिळविण्यासाठी ते संघर्ष करीत आहेत. त्यातून त्यांनी आपल्या समाजातील मूला- मूलींना शिक्षण मिळावे म्हणून १९४६ ला मुंबई येथे सिद्धार्थ महाविद्यालयाची स्थापना केली. " शिक्षण म्हणजे वाघीनीचे दूध आहे, जो वे प्राशन करेल तो गुरगुरल्याशिवाय राहणार नाही". असे त्यांनी शिक्षणाबाबत म्हंटले आहे. तर बळी हा बकरीचा दिला जातो, वाघाचा नाही. त्यामुळे तुम्ही शिक्षण घेवून वाघासारखे बना म्हणजे तुमच्या वाटयाला कोणीही जाणार नाही. व्यक्तीला निर्भिड बनविण्यासाठी शिक्षण महत्वाची भूमिका बजावते. व्यक्तीमध्ये आत्मविश्वास निर्माण होतो. कोणत्याही संकटाला सामोरे जाण्यानी ताकत व्यक्तीमध्ये निर्माण होते.

प्राथमिक, माध्यमिक व उच्च शिक्षण

डॉ. आंबेडकरांच्या मते शिक्षण हे समाज परिवर्तनाचे आणि शोषणातून मुक्तीचे सर्वात प्रभावी साधन आहे. त्यांनी आपल्या जीवनात शिक्षणाच्या महत्त्वाला ओळखले होते आणि त्यामुळेच त्यांच्या सर्व विचारधारेत शिक्षणाला महत्त्वाचे स्थान दिले आहे. बाबासाहेबांनी आपल्या संघर्षमय जीवनातून हे जाणले की शिक्षणाशिवाय कोणत्याही प्रकारची स्वतंत्रता किंवा सन्मान प्राप्त करणे शक्य नाही. 'मुंबई इलाख्यातील प्राथमिक शिक्षणाची प्रगती' या लेखात ते म्हणतात, "प्राथमिक शिक्षणाचा सार्वत्रिक प्रसार सर्वांगिन राष्ट्राच्या प्रगतीच्या इमारतीचा पाया आहे. केवळ लोकांच्या खुशीवर हा प्रश्न सोपविल्यास प्राथमिक शिक्षणाचा सार्वत्रिक प्रसार होण्यास कैक शतके लागतील. म्हणूनच शिक्षणाच्या बाबतीत सक्तीचा कायदा करावा लागतो. आघाडीस आलेल्या सर्व देशांनी सक्तीचा कायदा करून लोकांची निरक्षरता हहपार केली असे आपणास दिसून येते. जे वर्ग आधीच शिक्षणाचा लाभ घेतात त्यांच्यावर अर्थातच शिक्षणाची सक्ती करावी लागत नाही. ज्यांना शिक्षणाचे महत्त्व कळत नाही व जे त्या बाबतीत उदासीन असतात त्यांच्या करीताच सक्तीच्या कायद्यांची आवश्यकता असते."[३] (वसंत मून/हरी नरके, २००८, पृष्ठ २७८.) शिक्षण हे समाजाच्या सर्व घटकांपर्यंत पोहचले पाहिजे यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची प्राथमिक शिक्षणावरती मदार होती. यासाठी वेगवेगळ्या प्रसंगी प्राथमिक शिक्षणाबाबत आपले मत व्यक्त करताना सक्तीच्या व मोफत शिक्षणाचा आग्रह धरला होता. पण राज्यकर्ते तेवढ्या गांभीयनि याकडे लक्ष देत नव्हते. १९२० साली झालेल्या कायद्याने मुंबई शहरातील प्राथमिक शिक्षण मुंबई म्युनिसिपालिटीच्या ताब्यात आले आणि १९२३ च्या कायद्याने जिल्ह्यातील प्राथमिक शिक्षण स्थानिक म्युनिसिपालिटी आणि लोकल बोर्डकडे

सुपुर्द केले. यावेळी डॉ. परांजपे शिक्षणमंत्री होते. प्राथमिक शिक्षणातील लबाडी बाबत डॉ. आंबेडकर म्हणतात, लोकलबोर्ड व म्युनिसिपालिट्या म्हणजे वर्णाश्रमवाद्यांच्या संस्था आहेत, त्यांच्यात भरणा होणार तो ब्राह्मण्यग्रस्त अज्ञान जनतेचाच होणार असे लोक अस्पृश्यांच्या शिक्षणाची काळजी घेतील हे कशावरून सांगता येईल. सरकारने शिक्षण खाते सोपीव खात्याकडे सुपूर्द करून लोकल बोर्ड व म्युनिसिपालिट्या कडे शिक्षणाचा भार सोपविला यामुळे अस्पृश्यांना शिक्षण मिळणे दुरापास्तच होते. डॉ. आंबेडकरांनी शिक्षण अनुदान विधेयकावरती चर्चा करताना असा कायदा करणे किती चूक आहे हे सांगताना ते म्हणतात. "या कायद्यान्वये शिक्षणाची जबाबदारी अशा लोकांच्या स्वाधीन करण्यात आली की ते पुरसे सुबुद्ध नाहीत आणि त्यांना शिक्षणाच्या महत्वाची जाणीवही नाही. म्हणून या सभागृहात शिक्षणाचा कायदा करुन ज्याना त्याविषयी कोणतीही जाण नाही आणि आस्थाही नाही अशांच्या हाती सोपवून फार मोठी चूक केली आहे. ज्यांना ही जबाबदारी पेलणे शक्यच नाही. अशा स्थानिक संस्थांच्या खांद्यावर ही जबाबदारी टाकली आहे. यामुळे शिक्षणाच्या प्रचार आणि प्रसाराला अनिश्चित काळापर्यंत पायबंद घातला आहे. यामुळे सर्वात जास्त हानी अस्पश्यांनी होणार आहे."[४] (बहिष्कृत भारत, डॉ. आंबेडकरांचा अग्रलेख, ३१ मे १९२९.) ६ मे १९२९ रोजी मुंबई सरकारचे शिक्षणमंत्री ना. मौलवी रफिउद्दिन अहमद यांच्या उपस्थितीमध्ये महाबळेश्वर येथे प्राथमिक शिक्षणाची प्रगती झपाट्याने कशी करता येईल याचा विचार करण्यासाठी भरलेल्या परिषदेमध्ये डॉ. बाबासाहेच आंबेडकर म्हणतात, 'प्राथमिक शिक्षणाचा सार्वत्रिक प्रसार, सर्वांगीण राष्ट्रीय प्रगतीच्या इमारतीचा पाया आहे. केवळ लोकांच्या खुषीवर हा प्रश्न सोपविल्यास प्राथमिक शिक्षणाच्या सार्वत्रिक प्रसार होण्यास कैक शतके लागतील"[५] (बहिष्कृत भारत, डॉ. आंबेडकरांचा अग्रलेख, ३१ मे १९२९.) प्राथमिक शिक्षण सक्तीचे केले जावे आणि साधनवंचित समाजाला ते मोफत दिले जावे, अशी डॉ. बाबासाहेबांची भूमिक होती. ज्यांच्याकडे सत्ता आणि संपत्ती अशी साधने आहेत, अशांना मोफत शिक्षण देऊ नये. याउलट सक्तीच्या शिक्षणाचा खर्च भागविण्यासाठी संपन्न लोकांवर नवी कर आकारणी केली पाहिजे असेच त्यांना वाटत होते. भारतीय समाजशास्त्र आणि अर्थशास्त्र यांचा मेळ घालणे असा डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा त्यामागील हेतू होता. केवळ बाराखड्या शिकविणे म्हणजे शिक्षण नव्हे तर मुलांची मने सुसंस्कृत करणारे दर्जेदार शिक्षणही शाळांनी दिले पाहिजे, इतका सूक्ष्म विचार बाबासाहेबांनी प्राथमिक शिक्षणाच्याबाबत केला हे विशेष!

समाज व राष्ट्राला प्रगतीपथावर घेऊन जाण्यासाठी उच्च शिक्षण हे एक महत्त्वाचे साधन आहे. त्यामुळे उच्च शिक्षण हे केवळ एकाच उच्चवर्णीय समाजाच्या हाती न राहता ते समाजाच्या खालच्या स्तरापर्यंत पोहचले पाहिजे, असे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना वाटत होते. मागासवर्गीय लोकांना घटनात्मक आणि कायदे बनविण्याचे अधिकार प्राप्त करुन देण्याच्या कार्यात आंबेडकरांच्या प्रयत्नांचा उत्साहाचा आणि बुध्दीचा बराच भागखर्च होत होता तरी सुध्दा आपले लोक शिक्षणात मागासलेले असल्यामुळे शिक्षण हीच आपल्या लोकांची मोठी गरज आहे. शिक्षण हेच प्रगतीचे प्रभावी साधन आहे ही जाणीव त्यांच्या मध्ये नेहमी जागृत होती. त्यांनी "बहिष्कृत हितकारिणी सभा १४ जून १९२८ रोजी विसर्जित करण्याचा ठराव केला आणि बहिष्कृत वर्गात शिक्षण प्रसार करणेसाठी 'भारतीय बहिष्कृत समाज शिक्षण प्रसारक मंडळ' काढण्याचे ठरले. अस्पृश्य समाजातील लोकांना आपल्या मुलांच्या माध्यमिक शिक्षणावरती होणारा खर्च झेपण्यासारखा नव्हता. त्या मुलांची सोय व्हावी म्हणून दलित वर्ग शिक्षण संस्थेने छात्रालये उघडण्याचे कार्य हाती घेतले आणि या कार्यासंबंधी आंबेडकरांनी सरकारला साहय करण्याविषयी कळकळीचे आवाहन केले. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी प्राथमिक शिक्षणाबरोबर माध्यमिक शिक्षण बाबतही प्रयत्न आणि कामे केलेली आहेत. त्यांच्या आवाहनाला राज्यपालांनी दाद दिली त्यानुसार सरकारने ८ ऑक्टोबर १९२८ रोजी एक योजना समंत केली. त्यानुसार माध्यमिक शिक्षण घेणाऱ्या केवळ अस्पृश्य वर्गीय मुलांच्या उपयोगाकरिता पाच छात्रालयाच्या योजनेस आपण मान्यता देवू अशी राज्यपालानी घोषणा केली." धनंजय कीर एके ठिकाणी म्हणतात, आंबेडकरांना खचितच माहीत होते की, आपल्या लोकांना राजकीय दृष्ट्या समानता आणि राजकीय क्षेत्रात सामर्थ्य ही प्राप्त करुन दिल्यास त्यांच्या शिक्षणाचा प्रश्न आपोआप सरकारी खात्याच्या वतीने सोडवला जाईल असे त्यांना वाटत होते म्हणून त्यांनी आपला वेळ, बुध्दीही अस्पृश्यांची शैक्षणिक प्रगती करुन घेण्यापेक्षा त्यांना राजकीय हक्क प्राप्त करुन देण्याच्या कामी लावली. पण धनंजय कीर यांचे हे मत फारसे बरोबर आहे असे वाटत नाही, कारण डॉ. आंबेडकरांनी राजकारणाकडे जितक्या बारकाईने पाहिले तितक्याच बारकाईने अस्पृश्यांच्या शिक्षणाकडे पाहिलेले आहे. राजकारणातून मिळणाऱ्या सोयी सवलतींच्यासाठी शिक्षणाची आवश्यकता आहे, हे डॉ. आंबेडकरांना चांगले माहीत होते. म्हणूनच विद्यार्थी दशेत सुध्दा शिक्षणाबाबत त्यांची मते किती महत्त्वपूर्ण आहेत.

शिक्षण स्वातंत्र्याची प्रेरक शक्ती आहे असे त्यांना वाटत होते, यासंबंधात ते म्हणतात, "हिंदू समाजाच्या अगदी खालच्या थरातून आल्यामुळे शिक्षणाचे किती महत्व आहे हे मी जाणतो. खालच्या समाजाची उनती करण्याचा प्रश्न आर्थिक

असल्याचे मानन्यात येते, पण ही मोठी चूक आहे. हिंदूस्थानातील दलित समाजाची उन्नती करणे म्हणजे त्यांच्या अन्न, वस्त्र, निवाऱ्याची सोय करुन पूर्वीप्रमाणेच त्यांना उच्चवर्गाची सेवा करावयास लावणे नव्हे. खालच्या वर्गाची ज्यांच्यामुळे प्रगती खुंटून त्यांना दुसऱ्याचे गुलाम व्हावे लागले तो न्यूनगंड त्यांच्यापासून नाहीसा करणे, चालू समाज पध्दतीमुळे जे त्यांचे जीवन लुबाडण्यात आले त्यांचे त्यांच्या स्वतःच्या आणि राष्ट्राच्या दृष्टीने काय महत्व आहे याची त्यांना जाणीव करुन देणे हाच खालच्या वर्गाचा प्रश्न आहे उच्च शिक्षणाच्या प्रसाराखेरीज दुसऱ्या कशानेच हे साध्य होणार नाही. आमच्या सर्व सामाजिक दुखण्यावर माझ्या मताप्रमाणे हेच औषध आहे. प्राथमिक शिक्षण आणि माध्यमिक शिक्षणाची जशी दलित समाजाला निकडीची गरज आहे. त्याचप्रमाणे या समाजाला उच्च शिक्षणाचीही तेवढ्याच निकडीने आवश्यकता आहे असे विविध भाषणातून डॉ. बाबासाहेब आंबेडकर सांगत होते.

स्त्री शिक्षण

डॉ. आंबेडकरांनी शिक्षण हाच यांच्या सर्व दुखण्यावरील रामबाण उपाय आहे हे ओळखले होते. त्यांच्या सामाजिक कार्याची सुरुवात जरी १९२० पासून झाली असली तरी दलित्तोध्दाराबाबतची आपली परखड मते त्यांनी उच्च शिक्षण घेत असतानाच मांडलेली दिसतात. विशेष करुन मुलींच्या शिक्षणाबाबत भारतीय समाज हा नेहमीच पक्षपाती राहिला आहे. या संबंधीचे आपले विचार त्यांच्या वडीलांचे मित्र शिवनाक गौनाक जमेदार (पोईमकर) यांना अमेरिकेहून ४ ऑगष्ट १९१३ साली पत्र लिहून कळविले त्या पत्रामध्ये कळतात. या पत्रात ते म्हणतात, "पालक मनात आणतील तर ते आपल्या मुलांचे भवितव्य साकारू शकतात, पण या तत्वांचा अंगीकार केला तर आणि त्यानुसार कृती केली तर आपणास चांगले दिवस येतील आणि प्रगती पथावर आपली वाटचाल अधिक गतीने होईल, याकरिता मुलांच्या शिक्षणासोबत आम्हांला मुलींच्या शिक्षणाचाही तेवढ्याच गंभीरतेने विचार करावा लागेल आणि त्यानुसार कृती करावी लागेल"[६](चा.भ. खैरमोडे, पृष्ठ ६६.) डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी मुलांच्या शिक्षणाबरोबरच मुलींनाही शिक्षण मिळाले पाहिजे असे विचार त्यांनी विद्यार्थी दशेतच मांडल्याचे या पत्रातून दिसते. डॉ. आंबेडकरांनी स्त्रियांना शिक्षण मिळणे अत्यंत गरजेचे मानले. त्यांची समाजातील भूमिका, सन्मान, आणि स्वतंत्रता ही स्त्री शिक्षणावर आधारित होती. त्यांचा विश्वास होता की जर स्त्री शिक्षित झाली तर ती फक्त आपल्या कुटुंबालाच नव्हे, तर संपूर्ण समाजालाच योग्य दिशा देऊ शकते. भारतीय समाजात स्त्रियांना दुसऱ्या दर्जाचे नागरिक मानले जात होते आणि त्यांच्या शैक्षणिक हक्कांना नाकारले जात होते. या पार्श्वभूमीवर डॉ. आंबेडकरांनी स्त्रियांच्या शिक्षणाला प्राधान्य दिले. त्यांनी सांगितले की शिक्षणामुळे स्त्रिया आर्थिकदृष्ट्या स्वतंत्र होऊ शकतील, आपल्या अधिकारांबद्दल जागृत होतील, आणि समाजात आपले स्थान सुधारू शकतील.

मागासवर्गीय विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती

पेशव्यांच्या काळात हा अधिकार मुळीच नव्हता. संपुर्ण राज्य व्यवस्थाच मनुस्मृतीवरती आधारीत होती. राज्यव्यवस्थेला धर्माचे अधिष्ठान होते. या सनातनी विचारधारेमुळे शैक्षणिक क्षेत्रात कमालीची विषमता निर्माण झाली होती. त्यांनी मागासवर्गीयांना शिक्षणापासून जाणीवपूर्वक लांब ठेवले होते. अस्पृश्यांसह बहुजन समाजावर हजारो वर्षापासून शैक्षणिक बंदी आणली होती. ही बंदी धर्मसंमत कायद्याने आणली गेली होती. म.जोतीराव फुले, शाहू महाराज, श्रीमंत सयाजीराव गायकवाड यांच्या प्रयत्नाने ही शैक्षणिक बंदी उठवण्यात आली. म्हणून ब्राम्हण समाजाचे शैक्षणिक प्रमाण आणि अस्पृश्येतरांच्या शिक्षणाची दुरावस्था संपवायची असेल तर त्यांना विशेष शैक्षणिक सवलती देण्याची गरज आंबेडकरांनी प्रतिपादित केली होती. हा पक्षपातीपणा नसून मनुष्यत्वच नाकारलेल्या माणसाला माणूस म्हणून नवे जीवन प्रदान करण्याचा प्रयत्न होता. बुद्धीचा आणि माणसाचा काही संबंध असतो हेच माहित नसलेल्या माणसाला सज्ञान व विचार प्रवृत्त करण्याचा तो एक प्रामाणिक प्रयास होता. दुर्लक्षित समाजघटकांना समतेच्या पातळीवर आणण्यासाठी सवलती देणे ही न्यायोचित बाब होय. त्या दृष्टीने सरकारने आपले धोरण निश्चित केले पाहिजे, अशी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची भूमिका होती. "दोन माणसे सद्ध असतील तर एकाला मलिदा व दुसऱ्याला कोंडा देणे केव्हाच रास्त होणार नाही. पण एक रोगी व दुसरा निरोगी असला तर निरोग्याला कोंडा व रोग्याला मलिदा हिच व्यवस्था प्रशस्त ठरेल.[७] (डॉ. बाबासाहेब आंबेडकर पृष्ठ ६६.) मागासवर्गीयांना शिक्षण दिले पाहिजे व त्याचबरोबर त्यांना इतर समाजाच्या बरोबरीने आणण्यासाठी विशेष दर्जा व सवलतीची आवश्यकता आहे हा विचार म. फुले शाहू महाराज यांच्यानंतर भारतात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी मांडला. शिवाय शिक्षण सरसकट सर्वांसाठी मोफत न करता जे फी देऊ शकतात त्यांच्याकडून ती घ्यावी म्हणजे सक्तीच्या शिक्षणाचा खर्च भागविण्यास मदत होईल, असेही त्यांचे मत होते. मागासवर्गीय विद्यार्थ्यांना मदत म्हणून शिष्यवृत्ती देण्यात यावी असे सांगताना बाबासाहेबांनी म्हटले आहे. 'मागासवर्गीय विद्यार्थ्यांचे पालक इतके गरीब असतात की, स्कॉलरशीप ही विद्यार्थ्यांच्या शिक्षणाला केलेली मदत आहे, कुटुंबाला दिलेली देणगी नव्हे, हे विसरून विद्यार्थ्यांना मिळणाऱ्या

शिष्यवृत्तीचा ते दुरुपयोग करतात. म्हणून या पैशातून सरकारने किंवा खासगी संस्थांनी वसतिगृहे चालविणे विद्यार्थी हिताचे होईल'. बाबासाहेबांनी स्वातंत्र्यपूर्व हिंदुस्थान सरकारकडून मागासवर्गीय विद्यार्थ्यांसाठी ३ लाख रुपयांचा निधी मिळविला होता. परिणामी बऱ्याच विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती मिळू लागली होती. पण तरीही आपलेच विद्यार्थी मोठ्या प्रमाणात नापास होतात, याविषयी नाराजी व्यक्त करताना बाबासाहेब म्हणतात, 'मी लहानशा खोलीत राहत होतो. या खोलीत माझे कुटुंब, बहिणीची दोन मुले, एक बकरी, जाते, पाटा होता. मिणमिणत्या दिव्याखाली मी अभ्यास करीत होतो. आता विद्यार्थ्यांना चांगली वसतिगृहे असताना त्यांनी अभ्यास का करू नये' असा प्रश्न उपस्थित करून बाबासाहेब म्हणतात, 'आपल्या देशात रानडे, गोखले, टिळक, सर फेरोजशहा मेहता व त्यांच्यासारखे कितीतरी आस्थेवाईक विद्यार्थी निर्माण झाले. त्यांच्यामध्ये एक ऊर्मी, शिस्त होती. जबाबदारीची जाणीव होती, पण अशी जाणीव आजच्या विद्यार्थ्यांत नाही असे सांगून 'शिक्षण हाच जीवनाच्या प्रगतीचा मार्ग आहे हे जाणून विद्यार्थ्यांनी भरपूर अभ्यास करावा आणि समाजाचे विश्वासू नेते बनावे' असे त्यांनी नमूद करून ठेवले.२२ सप्टेंबर १९५१ च्या 'जनता' या नियतकालिकामध्ये त्यांचे शिक्षणाविषयक विचार छापून आले आहेत. त्यात ते म्हणतात, "हिंदुस्थानातील दलित समाजाची उन्नती करणे म्हणजे त्यांच्या अन्न, वस्त्र व निवाऱ्याची सोय करून पूर्वीप्रमाणेच त्यांना उच्च वर्गाची सेवा करावयास लावणे नव्हे. खालच्या वर्गाची ज्याच्यामुळे प्रगती खुंटून त्यांना दुसऱ्याचे गुलाम व्हावे लागले तो न्यूनगंड त्यांच्यापासून नाहिसा करणे चालू समाजपद्धतीमुळे जे त्यांचे जीवन लुबाडण्यात आले, त्याचे त्यांच्या स्वतःच्या आणि राष्ट्राच्या दृष्टीने काय महत्व आहे, याची त्यांना जाणीव करून देणे हाच खालच्या वर्गाचा प्रश्न आहे. उच्च शिक्षणाच्या प्रसाराखेरीज दुसऱ्या कशानेच हे साध्य होणार नाही. आमच्या सर्व सामाजिक दुःखावर माझ्या मताप्रमाणे हेच ओषध आहे."[६] (डॉ. गंगाधर पानतावणे, पृष्ठ २२७-२२८.) उच्च शिक्षणानेच अस्पृश्यांची गुलामगीरी नष्ट होइल, असे मानणारे डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे भारतातील पहिले शिक्षणतज्ञ होत.

महाविद्यालयाची उभारणी

शिक्षणाचे महत्त्व ओळखणाऱ्या बाबासाहेबांनी १९२८ मध्ये दलितवर्ग शिक्षण संस्थेची स्थापना केली. सिडनेहॅम कॉलेजमध्ये अर्थशास्त्राचे प्राध्यापक म्हणून काम केलेनंतर १९३५ मध्ये शासकीय महाविद्यालयात प्राचार्य म्हणून त्यांनी कार्य केले. त्याचबरोबर ८ जुलै १९४५ मध्ये पिपल्स एज्युकेशन सोसायटीची स्थापना केली. त्याअंतर्गत १९४६ मध्ये सिध्दार्थ महाविद्यालयानी मुंबई व १९५० मध्ये मिलिंद महाविद्यालयानी औरंगाबाद येथे स्थापना केली. वरील सर्व महाविद्यालयामार्फत समाजातील होतकरू, हुशार तरूणांना मोफत शिक्षण दिले बाते. आज पिपल्स एज्युकेशन सोसायटीचा व्याप प्रचंड वाढला असून डॉ. आंबेडकरांच्या पश्च्यात सोसायटीने अनेक शाळा महाविद्यालयाची स्थापना करून त्यांचे स्वप्न साकार केले आहे. शिक्षणाचे महत्त्व ओळखणाऱ्या बाबासाहेबांनी दि. २० जून, १९४६ रोजी मुंबई येथे सिद्धार्थ महाविद्यालय आणि दि. १९ जून, १९५० साली औरंगाबाद येथे मिलिंद महाविद्यालयाची स्थापना केली. बाबासाहेबांनी अशा प्रतिकूल स्थितीत औरंगाबादेत मिलिंद महाविद्यालयाची उभारणी करून मराठवाड्याच्या शैक्षणिक, सामाजिक, सांस्कृतिक जीवनात परिवर्तन घडविणारा एक देदीप्यमान इतिहास निर्माण केला हे विसरता येत नाही. मिलिंद कॉलेजच्या परिसरास नागसेनवन असे नाव दिले आहे. पिपल्स, सिध्दार्थ, मिलिंद नागसेन ही नावे लोकशाही, विचारस्वातंत्र, चिकित्सा व प्रामाणिक, बौध्दीक वादविवादाची प्रतिके आहेत. बाबासाहेब हे विद्वतेचे, ज्ञानाचे भोक्ते होते. त्यांनी म्हणूनच असे सांगून ठेवले की- 'शिक्षक हा शालेय असो, महाविद्यालयीन असो की विद्यापीठीय असो त्याचे कर्तृत्त्व उत्तुंग आणि विद्यार्थ्यांना अनुकरणीय वाटले पाहिजे. थोडेसे रुपये मिळवावेत व आपली सुखेनैव कालक्रमणा करावी यापलीकडे आपल्या प्रोफेसरांना काही महत्त्वाकांक्षाच नाही. ते अधून-मधून काही पाठ्यपुस्तकांवर टिपणे लिहितात. पण टिपणे लिहिण्यापलीकडे काही महत्त्वाचे कार्य आहे, याची त्यांना माहिती नाही.ते असेही म्हणतात की, 'प्राध्यापकांनी अध्यापन आणि अध्ययनात स्वतःला इतके गुंतवून घ्यावे की, आपल्या घराकडेही बघण्याची सवड त्यांना मिळू नये. ते काम त्यांनी त्यांच्या पत्नीकडे सोपवावे. संशोधन करावे. त्याचप्रमाणे प्राध्यापक हा नुसताच विद्वान असून चालत नाही, तर तो बहुश्रुत असला पाहिजे. तो उत्साही असला पाहिजे. आपला विषय अधिकाधिक माहितीपूर्ण आणि मनोरंजक करू अशी धमक त्याच्यात असली पाहिजे. बाबासाहेबांची अजून एक विशेषता अशी की, अलीकडील शिक्षणसम्राटांप्रमाणे त्यांनी आपल्या शैक्षणिक संस्थेस स्वतःचे नाव दिले नाही. त्यांचे वडील सुभेदार रामजी आंबेडकर वा त्यांच्या आई भीमाई यांचे नावही ते आपल्या संस्थेस देऊ शकले असते. पण त्यांनी असे केले नाही. तर संस्थेस पीपल्स एज्युकेशन सोसायटी व महाविद्यालयांना सिद्धार्थ, मिलिंद अशी नावे दिली. औरंगाबादच्या १५० एकर विस्तीर्ण परिसरास नागसेनवन नाव दिले. पीपल्स, सिद्धार्थ, मिलिंद, नागसेन ही नावे लोकशाही, विचारस्वातंत्र्य, चिकित्सा व प्रामाणिक बौद्धिक वादविवादाची प्रतीके आहेत. बाबासाहेबांचे शैक्षणिक कार्य-कर्तृत्व पाहता शिक्षण क्षेत्रात आज जी अराजकसदृश स्थिती निर्माण होऊन गुणवत्तेची घसरण होत आहे आणि शैक्षणिक

संस्था सामाजिक बांधिलकीच्या जाणिवेतून नव्हे तर नफेखोरीच्या दृष्टिकोनातून उभारण्यात येत आहेत, ते पाहता बाबासाहेबांच्या मूल्यगर्भ शैक्षणिक विचारांचे सदोदित मनन-चिंतन होणे गरजेचे आहे.

**डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी भारताच्या संविधानात केलेल्या शैक्षणिक तरतूदी**

भारतीय समाजामध्ये मोठया प्रमाणात विषमता पाहायला मिळते. या देशाची साधन संपत्ती एका विशिष्ट वर्गाच्या हातात एकवटली आहे. परिणामी नैसर्गिक संसाधनाची विषम विभागणी झाली आहे. देशामध्ये समानता प्रस्तापित व्हावी यासाठी भारतीय संविधानाच्या कलम १४ मध्ये याचा समावेश मुलभूत हक्कामध्ये करण्यात आला आहे. मूलभूत हक्कांची सर्व व्यक्तींना जाणीव व्हावी म्हणून शिक्षणामध्ये सुध्दा मुलभूत हक्कांचा अंतर्भाव करण्यात आला

२८.१. नुसार राज्याच्या पैशातून चालवल्या जाणा-या कोणत्याही शैक्षणिक संस्थेत कोणतेही धार्मिक शिक्षण दिले जाणार नाही विवक्षित शैक्षणिक संस्थान धार्मिक शिक्षण अथवा धार्मीक उपासना यांना उपस्थित राहण्याबाबत स्वातंत्र आहे.

२९.२. राज्याकडून चालविल्या जाणा-या किंवा राज्य निधीतून सहाय मिळत असलेल्या कोणत्याही शैक्षणिक संस्थेत कोणत्याही नागरीकास केवळ धर्म, वंश, जात. भाषा या किंवा यापैकी कोणत्याही कारणावरून प्रवेश नाकारला जाणार नाही

३०.१, धर्म किंवा भाषा या निकषानुसार अल्पसंख्याक असलेल्या सर्व वर्गांना आपल्या पसंतीच्या शैक्षणिक संस्था स्थापण्याच्या व त्यांचे प्रशासन करण्याचा हक्क असेल,

३०.२, शैक्षणिक संस्थांना सहाय देताना राज्य, एखादी शैक्षणिक संस्थाही, धर्म किंवा भाषा या निकषानुसार अल्पसंख्याक असलेल्या एखाद्या वर्गाच्या व्यवस्थापनाखाली आहे. या कारणावरून तिला प्रतिकुल होईल, अशाप्रकारे भेदभाव करणार नाही

२१ क राज्य हे सहा वर्षापासून ते चौदा वर्षापर्यंत च्या मुलांना, कायद्याने ठरविल्यानुसार शिक्षण देईल

४१- राज्य हे आपली आर्थिक समता व विकास यांच्या मयदित कामाचा, शिक्षणाचा हक्क आणि बेकारी, वार्धक्य, आजार व विकलांगता यांनी पीडीत अशा व्यक्तींच्या बाबतीत आणि काहीही अपराध नसताना हलाखीचे जिणे ज्यांच्या वाटपाला आले आहे अशा अन्य व्यक्तींच्या बाबतीत लोकसहायाचा हक्क उपलब्ध करून देण्यासाठी परिणामकारक तरतूद करील.

४५- राज्य हे बालकांचे वय सहा वर्षांचे होईपर्यंत, त्यांचे संगोपन करण्यासाठी आणि त्यांच्या शिक्षणासाठी तरतूद करील

४६- राज्य, जनतेतील दुर्बल घटक आणि विशेषतः अनुसूचित जाती, अनुसूचित जनजाती यांचे शैक्षणिक व आर्थिक हितसंबंधन विशेष काळजीपूर्वक करील, आणि सामाजिक अन्याय व सर्व प्रकारचे अन्याय व
शोषण यापासून त्यांचे रक्षण करील

51- जो जन्मदाता असेल किंवा पालक असेल त्याने आपल्या पाल्यास त्याच्या वयाच्या सहाव्या वर्षापासून ते पैदाव्या वर्षापर्यंत शिक्षणाची संधी उपलब्ध करून देणे

३३७- आग्ली भारतीय समाजाच्या लाभाकरता शैक्षणिक अनुदानाबाबत विशेष तरतूद

३५० क प्रत्येक राज्य आणि राज्यातील प्रत्येक स्थानिक प्राधिकारी भाषिक अल्पसंख्याक समाजातील मुलांना शिक्षणाच्या प्राथमिक स्तरावर मातृभाषेतून शिक्षण देण्याच्या पर्याप्त सोयी उपलब्ध करून देण्यासाठी प्रयत्नशील राहील आणि अशा सोयी पुरवणे शक्य व्हावे, यासाठी राष्ट्रपती स्वतःला आवश्यक किंवा योग्य वाटतील असे निर्देश कोणत्याही राज्याला देवू शकेल.

३७१ ड - ससंदेला आंध्रप्रदेश राज्यात केंद्रीय विद्यापीठाची स्थापना करण्यासाठी कायद्याद्वारे तरतूद करता येईल

शिक्षणाची व्यापकता

शिक्षणाशिवाय तरणोपाय नाही हे मर्म बाबासाहेबांनी ओळखले होते. त्यांच्या या शैक्षणिक वाटचालीतूनच त्यांची शिक्षण विषयक भूमिका विकसित झालेली दिसून येते. बाबासाहेबांनी आपल्या विविध ग्रंथसंपदेतून सातत्याने शैक्षणिक प्रबोधन केले. विद्यार्थी वर्गासाठी त्यांचे विचार दिपस्तंभासारखे मार्गदर्शक ठरतात. 'विद्यार्थ्यांनो जागृत व्हा.' या लेखात त्यांनी शिक्षणाच्या काळातील क्षण अन् क्षणाचे महत्त्व सांगितले असून विद्यार्थी जीवनात विद्यार्थी आपले कर्तव्य व जबाबदारी कशी पार पाडतात यावरच समाजाचे भवितव्य अवलंबून असते यावर त्यांचा ठाम विश्वास होता. विद्यार्थ्यांच्या ज्ञान जिज्ञेसेसंदर्भात ते लिहितात, "जगात एवढे ज्ञान आहे की, एखाद्याने आयुष्यभर जरी शिक्षण घ्यायचे ठरविले तरी फार झाले तर ज्ञानसागराच्या पायथ्याशी गुढघाभर पाण्यात आपण पोहोचू शकू." शिक्षण घेत असताना विद्यार्थी वर्गाने दोन गोष्टी

ध्यानात ठेवल्या पाहिजेत. बुध्दीमत्तेत आणि कार्यक्षमतेत आपण कमी पडणार नाही याची दक्षता घेतली पाहिजे. तसेच व्यक्तिगत सुखापेक्षा आपला समाज स्वतंत्र, स्वावलंबी व सन्माननीय कसा होईल याकडे लक्ष पुरविले पाहिजे असे विचार त्यांनी आपल्या शैक्षणिक विचार मंथनातून व्यक्त केले आहेत. शिक्षण घेवून तरूणांनी आपल्या शिक्षणाचा उपयोग स्वत: साठी न करता समाजासाठी केला पाहिजे यावर बाबासाहेबांचा भर होता. शिक्षणाने केवळ स्वत:ची आर्थिक स्थिती सुधारली म्हणजे भागले असा संकुचित विचार न करता आपल्या समाजाचा सर्वांगीण उध्दार व्हावा यासाठी प्रयत्न केले पाहिजेत. अशा पध्दतीची समाजभिमुखतेची जाणीव नव शिक्षितांना करून देण्यास ते विसरत नाहीत. शिक्षण हे दुधारी तलवारीसारखे आहे. ती कशी चालवायची हे ती वापरणाऱ्यावर अवलंबून असते. शिक्षणाने चांगलेही करता येते आणि वाईटही करता येते, हे सांगताना बाबासाहेबानी शिकलेल्या माणसापासूनच समाजाला खरा धोका असल्याची भिती व्यक्त केली होती. कारण, सुशिक्षित लोक इतरांना कसे फसवायचे ते अधिक जाणतात म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी सुशिक्षित लोकांना आपल्या शिक्षणाचा वापर समाजाच्या भल्यासाठी करा आणि समाज विकासाचे स्वप्न साकार करा असे आव्हान केलेले दिसून येते.डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी शिक्षण व्यवस्थेत चारित्र्य आणि विनय याला फार महत्त्व दिले. चारित्र्यहिन व विनयहिन सुशिक्षित माणूस हा पशुपेक्षा भयंकर असतो. जर सुशिक्षित मनुष्याचे शिक्षण गरीब जनतेच्या हितास बाधा आणत असेल तर तो समाजाला शाप ठरतो. म्हणून शिक्षण शाप की वरदान ? या प्रश्नांचे उत्तर त्या व्यक्तीच्या चारित्र्य आणि विनयात दडलेले असते असे ते म्हणतात.शिक्षण संस्थेसंदर्भात आपली भूमिका मांडताना डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी शिक्षण संस्थेला एक पवित्र संस्था मानली आहे. शाळा म्हणजे उत्तम नागरिक तयार करण्याचे कारखाने आहेत. या कारखान्याचा जबाबदार घटक जेवढा शहाणा असेल तितका उत्तम माल कारखान्यातून बाहेर पडणार आहे. याची जाणीव ठेवून शिक्षणाचे उदात्त कार्य सुरू ठेवले पाहिजे,अशी त्यांची भूमिका होती. शिक्षकासंदर्भात विचार मांडताना बाबासाहेब म्हणतात, शिक्षण प्रक्रियेचा केंद्रबिंदू हा शिक्षकवर्ग असतो. तो राष्ट्राचा सारथी असतो. म्हणून बुध्दीमान, उदात्त, निपक्ष:पाती थोर मनाचे शिक्षकच राष्ट्राचा स्वाभिमान उंचावत असतात. म्हणून शिक्षकाचे स्थान इतरांपेक्षा उच्च असते. त्याचे भान ठेवल्यास खऱ्या अर्थाने शिक्षणाचा उद्देश सार्थक होईल अशी आशा त्यांनी व्यक्त केलेली दिसून येते. सुशिक्षित तरूणांना मार्गदर्शन करताना बाबासाहेब म्हणतात, 'सुशिक्षित तरूणांनी कोणत्याही कुबड्या न घेता स्वावलंबी जीवन जगावे, स्वत:च्या बुध्दीवर विश्वास तिचा उपयोग करावा, विवेक बुध्दीला शरण जावे. जगात ज्ञानापेक्षा पुज्जनिय असे काहीही नाही. तसेच कोणीही मनुष्य जन्मत:च मंद बुध्दीचा नसतो. तुम्हीच तुमच्या भाग्याचे शिल्पकार आहात.' शाळा-महाविद्यालये ही संस्कार केंद्रे व उत्तम नागरिक घडविण्याचे कारखाने असावीत, या भूमिकेतून डॉ. बाबासाहेब आंबेडकर शैक्षणिक संस्थांकडे पाहतात. कोणत्याही शैक्षणिक संस्थेत ज्ञानदानाची महत्वाची भूमिका शिक्षकांना पार पाडावी लागत असते. विद्यापीठ स्तरावरील शिक्षणाचा प्रभाव हा कायम स्वरुपी टिकणारा असतो. त्यामुळे महाविद्यालये ही कारकून निर्माण करण्याचा कारखाना ठरू नयेत, अशी त्यांची शिक्षण व्यवस्थेकडून अपेक्षा होती. परंतु प्राध्यापकांची परिश्रम करण्याची प्रवृत्ती नष्ट होत चालली आहे. याबद्दल त्यांना खेद वाटत होता. परिश्रम करणारे ध्येयवादी प्राध्यापक समजात निर्माण होत नाहीत याचे दु:ख बाबासाहेबांनी अनेक ठिकाणी व्यक्त केले आहे. १३ एप्रिल १९४७ रोजी 'नवयुग' या वृत्तपत्रासाठी दिलेल्या मुलाखतीत ते म्हणतात, "मला वाटते की थोडेसे रुपये मिळावे व आपली सुखाने कालक्रमणा करावी, या पलिकडे आपल्या प्रोफेसरांना आयुष्यात काही महत्वाकांक्षाच नाही. या महत्वकांक्षेच्या अभावामुळेच त्यांच्या हातून काहीही भरीव कार्य होत नसते. ते अधूनमधून काही पाठ्यपुस्तकावर टिपणे लिहितात. टिपणे लिहिण्यापलिकडे काही महत्वाचे कार्य आहे, याची त्यांना माहिती आहे की नाही कोण जाणे."[१] (गंगाधर पानतावणे, पृष्ठ २३६-२३७.) डॉ. बाबासाहेब आंबेडकर येथे शिक्षण व्यवस्थेतील एका कठोर वास्तवाचे प्रदर्शन करतात. प्राध्यापकांनी आयुष्यभर विद्याध्यांच्या भूमिकेत राहून परिश्रम, संशोधन आणि चितन यात स्वत.ला झोकून दिले पाहिजे

समारोप

बाबासाहेब आंबेडकरांनी जगातल्या सर्वोत्कृष्ट व नामांकित विद्यापीठात आपले शिक्षण पूर्ण केले होते. केंब्रीज, ऑक्सफर्ड, कोलंबिया विद्यापीठाप्रमाणे आपल्या भारतातीलही विद्यापीठांनी कामे केली पाहिजेत असे त्यांना वाटत होते व हे ते आमदार, खासदार, व मंत्री असताना वेळोवेळी बोलवून दाखवित होते. मुंबई विद्यापीठाचे कामकाज व त्यातील त्रुटी त्यांना माहित होत्या. यासंबंधात त्यांनी काही उपाय योजनाही सुचविल्या होत्या. भारतात सांस्कृतिक क्रांती जर व्हावयाची असेल तर मागासलेल्या समाजातील मुले इतर समाजातील मुलांच्याबरोबर शिकली पाहिजेत. अशी त्यांची तळमळ होती. दुदैवाने त्यांच्या अकाली निधनाने त्यांच्या सर्वच शिक्षण विषय योजना व कल्पना स्वतंत्र भारतात फुलद्रुप झाल्या नाहीत हे याठिकाणी आवर्जून नमूद करावयासे वाटते. हे सर्व विचार ते पांडत असताना त्यांना याचीही जाणीव होती की, हे विचार

आपल्या लोकांपर्यंत कसे पोहचवायचे म्हणून त्यांनी 'मुकनायक', बहिष्कृत भारत', 'जनता', 'प्रबुद्ध भारत'इ. वृत्तपत्रे चालवली निरक्षर मागासवर्गीय है वाचनाणार तरी कसे म्हणून त्यांना कार्यकर्ते तयार केले. विविध सभांतून पटवून दिले. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे शैक्षणिक विचार हे फक्त शिक्षणाच्या अधिकारांपुरते मर्यादित नव्हते, तर ते समाजाच्या सर्वांगीण विकासाचे दृष्टीकोन होते. त्यांच्या विचारांमध्ये शिक्षणाला समाजातील परिवर्तनाचे साधन मानले गेले आहे. शिक्षणाने व्यक्तीला शोषणातून मुक्तता मिळू शकते, त्याचे आत्मविश्वास आणि आत्मसन्मान वाढू शकतात, आणि तो समाजात आपले स्थान निर्माण करू शकतो.

संदर्भ:

1. डॉ. बाबासाहेब आंबेडकर बहिष्कृत भारत आणि मूकनायक संपा. वसंत मून/हरी नरके, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महात्मा फुले आणि राजर्षी शाहू चरित्र साधने प्रकाशन समिती, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन, २००८, पृष्ठ ६६.
2. डॉ. आंबडेकर खाजगी पत्रे ४ ऑगस्ट १९१३.
3. डॉ. बाबासाहेब आंबेडकर बहिष्कृत भारत आणि मूकनायक संपा. वसंत मून/हरी नरके, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महात्मा फुले आणि राजर्षी शाहू चरित्र साधने प्रकाशन समिती, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन, २००८, पृष्ठ २७८.
4. बहिष्कृत भारत, डॉ. आंबेडकरांचा अग्रलेख, ३१ मे १९२९.
5. बहिष्कृत भारत, डॉ. आंबेडकरांचा अग्रलेख, ३१ मे १९२९.
6. चा.भ. खैरमोडे, डॉ. बाबासाहेब आंबेडका जीवनचरित्र खंड १, पृष्ठ ६६.
7. डॉ. बाबासाहेब आंबेडकर बहिष्कृत भारत आणि मूकनायक, कित्ता, पृष्ठ ६६
8. डॉ. बाबासाहेच आंबेडकर : पत्रकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर, लेखक डॉ. गंगाधर पानतावणे, सुगत प्रकाशन, वैशालीनगर, नागपूर, २२ ऑक्टोबर २०१५, पृष्ठ २२७-२२८.
9. डॉ. बाबासाहेच आंबेडकर : पत्रकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर, लेखक डॉ. गंगाधर पानतावणे, सुगत प्रकाशन, वैशालीनगर, नागपूर, २२ ऑक्टोबर २०१५, पृष्ठ २३६-२३७.
10. भारतीय व पाश्चात्त्य विचारवंत कला व कृष्णा घौरमोडे
11. . महाराष्ट्र टाईम्स न्युजपेपर
12. शैक्षणिक तत्त्वज्ञान व शैक्षणिक समाजशास्त्र कुंडले, म. बा
13. https://www.mahamtb.com/Encyc/2022/4/14/article-on-babasaheb-ambedkar-Educational-Thoughts.html
14. https://ijcrt.org/papers /IRJHIS210203.
15. https://ijcrt.org/papers/IJCRT1807230.